सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१/ 262 दिनांक:- 22 JAN 2021

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, विनाअनुदानित ,
पदवी/पदव्युत्तर व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय:- महाडिबीटी पोर्टल राबविण्यात येणा-या डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेबाबत- २०२०-२१

संदर्भ :-1) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ०२/तांशि-४ दि. ०८ जानेवारी, २०२१

2) मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं /डीबीटी / २०२०-२१/विकाप/ १९ / दि. १४/०१/२०२१

उपरोक्त विषयासंबंधी शासनस्तरावरुन आदेश निर्गमित करण्यात आलेला असून सदर शासन पत्रानुसार संस्थांस्तरावर कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यांत यावी. (संदर्भिय पत्र क्र. ०१ संलग्न)

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

दूरध्वनी क्र ०२२-२२०४०९३५.
Email ID : sanjay.dharurkar@nic.in

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

क्रमांक : संकिर्ण-२०२१/प्र.क्र.०२/तांशि-४

दिनांक : ८ जानेवारी,२०२१

पत्र प्राप्त झाले
11 JAN 2021
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. २१...१००
दिनांक १२/१/२०२१
कार्यासन क्र. ९८

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय :- महाडीबीटी पोर्टलव्दारे राबविण्यात येणाऱ्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेबाबत - २०२०-२१**

वरील विषयाबाबत आपले संदर्भाधिन दिनांक २३/१२/२०२० चे पत्र कृपया पहावे.

२. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोवीड-१९ च्या आजाराच्या प्रार्दुभावामुळे अद्यापपर्यंत शैक्षणिक संस्था सुरु करण्यात आलेल्या नाहीत. मात्र ऑन-लाईन अभ्यासक्रम सुरु असल्याने विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत. त्यांच्या उपस्थितीची नोंद महाविद्यालयात होत आहे. तथापि, विद्यार्थी स्वत: चे घर सोडून महाविद्यालयाच्या ठिकाणी वसतिगृहामध्ये अथवा अन्य खाजगी घरामध्ये राहत नाहीत. त्यामुळे दिनांक २२/२/२०१८ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद-२ मध्ये अट क्रमांक ९ मध्ये नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेतल्याचा पुरावा देण्याची अट पूर्ण होत नसल्याने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पूर्ण दराने निर्वाह भत्ता अनुज्ञेय करण्यात येऊ नये.

३. चालू शैक्षणिक वर्षातील शैक्षणिक संस्था नियमित सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश घेतल्यास अथवा अन्य ठिकाणी राहण्याची व्यवस्था केल्यास त्यानंतर त्या पुराव्याच्या आधारे व इतर विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्यास उर्वरित कालावधीकरीता निर्वाह भत्ता अनुज्ञेय करण्यात यावा. मात्र जे विद्यार्थी ऑन-लाईन शिक्षणाकरीता महाविद्यालयाच्या ठिकाणी वसतिगृह अथवा अन्य खाजगी जागेत रहात असल्यास त्याची खात्री करुन त्यांना पूर्ण दराने निर्वाह भत्ता अनुज्ञेय करण्यात यावा.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन